


# सह्याद्रिनंदन (पुणे - वार्ताहर):

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे महाविद्यालय व हेल्प द ब्लाईंड फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरवारे महाविद्यालयातील सोबती क्लब फॉर दृष्टिबाधीत (दिव्यांग) मधील दिव्यांग १२ विद्यार्थ्यांना नुकतेच २ जानेवारी २०२४ रोजी मोफत लॅपटॉप वाटप करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विलास उगले व मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख तथा सोबती क्लब फॉर दिव्यांगचे चेअरमन डॉ. राकेश मोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना लॅपटॉप वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी हेल्प द ब्लाईंड फौंडेशनचे स्वयंसेवक श्री. प्रकाश सातवळेकर, श्री. के. गोपीनाथ, श्री. संजय कुलकर्णी व श्री.एन शिवाजी राव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हिंदी विभागप्रमुख डॉ. मिलिंद बनकर, उपप्राचार्य डॉ. प्रमोद सोनवणे, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री. किसन साबळे, डॉ. नितीन आडे, मानसशास्त्र विभागातील प्रा. ऋषिकेश इंगुळकर, प्रा. शशांक सराफ यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन डॉ. राकेश मोरे यांनी मुलांसाठी स्कॉलरशीप व इतर सवलती मिळवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच प्राचार्य प्रा.डॉ. विलास उगले यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.